रवींद्र नाटय मंदिर व मिनी थिएटर च्या स्टेज लाईट बाबतची देखभाल व दुरूस्ती व परिचलनाच्या देयकांस मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पुलदे-२०१८/प्र.क्र.५५/सां.का.२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ मार्च, २०१९

वाचा : प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे क्र. आस्थापना/२०१९/९०५, दि.०५.०१.२०१९ रोजीची पत्र.

प्रस्तावना :-

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथील रवींद्र नाटय मंदिर व मिनी थिएटर च्या स्टेज लाईट बाबतची देखभाल व दुरूस्ती व परिचलनाच्या दि. १.१०.२०१६ ते दि. २८.२.२०१८ या कालावधीतील रू. ७,७२,७७५/- (अक्षरी रूपये सात लाख बाहात्तर हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) या रक्कमेच्या प्रलंबित देयकाच्या कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव संदर्भाधिन दि.५.१.२०१९ अन्वये प्रकल्प संचालक, महाराष्ट्र कला अकादमी यांच्याकडून प्राप्त प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथील रवींद्र नाटय मंदिर व मिनी थिएटर च्या स्टेज लाईट बाबतची देखभाल व दुरूस्ती व परिचलनाच्या दि. १.१०.२०१६ ते दि. २८.२.२०१८ या कालावधीतील रू. ७,७२,७७५/- (अक्षरी रूपये सात लाख बाहात्तर हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) या रक्कमेच्या प्रलंबित देयकाच्या कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

०२. याबाबतचा खर्च मागणी क्र. झेडडी -२, २२०५, कला व संस्कृती, (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई (२२०५ १४६३), १३, कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

०३. प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुसार लेखाधिकारी यांनी भविष्यात अशा प्रकारच्या प्रस्तावांन संदर्भात उद्योग, उर्जा, व कामगार विभागाच्या दि. १.१२.२०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

०४. हा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ८८/२०१९/व्यय-१५, दि.२७.०३.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२९१७३६२४५८२३ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.03.30 11:38:57 +05'30'

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (सां.का.), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक.
२. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट कला अकादमी, मुंबई.
४. लेखाधिकारी, पु.ल. देशपांडे महाराष्ट कला अकादमी, मुंबई.
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा),मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८. कार्यासन अधिकारी, (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती, सां.का.२.